आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ जानेवारी २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

- आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२६ लोकसभेत सादर

- ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याची सांगता करणारा बिटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार

**आणि**

- न्यूझिलंडविरूद्धच्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा पराभव

**<><><><><>**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दोन्ही पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी बंदुकीच्या ३ फेरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. त्यांच्या निधनामुळे राज्य सरकारनं ३ दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. तसंच जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबियातील सर्व सदस्य उपस्थित होते.

पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असून लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी हजारो शोकाकुल नागरिकांनी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी गर्दी केली होती.

**<><><><><>**

बारामती इथं झालेल्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या, अजित पवार यांचे सुरक्षा अधिकारी विदीप जाधव यांच्यावर काल रात्री सातारा जिल्ह्यातल्या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. २००९ च्या तुकडीतले पोलीस हवालदार जाधव हे अजित पवार यांच्या सोबत विमानात होते.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२६ सादर केला. जागतिक अनिश्चितता आणि अमेरिकेच्या शुल्क धोरणानंतरही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत कामगिरी करत असल्याचं या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. आर्थिक सर्वेक्षणात चालू आर्थिक वर्ष २०२६ आणि आगामी आर्थिक वर्ष २०२७ साठी भारताच्या संभाव्य जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचे अंदाज जाहीर केले जातील. अर्थसंकल्पापूर्वी सादर केल्या जाणाऱ्या या आर्थिक सर्वेक्षणातून देशातील वार्षिक आर्थिक घडामोडींचा आढावा तसंच अल्पकालीन आणि मध्यमकालीन आर्थिक शक्यता मांडल्या जातात. आर्थिक सर्वेक्षण २०२६ मधील प्रमुख निष्कर्ष, धोरणात्मक सुधारणांबाबतचे मुद्दे, रुपयाचं अवमूल्यन, भू-राजकीय अस्थिरता आदी विषयांवर मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन सविस्तर माहिती देणार आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या देशातल्या पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत. हा क्षण देशाच्या संसदीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत सांगितलं.

येत्या १ फेब्रुवारीला सीतारामन अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**<><><><><>**

प्रलंबित समस्यांपलिकडे जाऊन दीर्घकालीन उपाययोजनांच्या मार्गावर देशाची वाटचाल होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ते संसद भवन परिसरात बातमीदारांशी बोलत होते. सुधारणा, कार्यक्षमता आणि परिवर्तन या तीन तत्त्वांवर केंद्र सरकार काम करत आहे. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या वर्गापर्यंत पोहोचवण्यावर सरकारचा भर असल्याचं असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

- **- प्रधानमंत्री बाईट होल्ड - -**

भारताला २०४७ पर्यंत विकसित देश करण्याचं लक्ष्य आहे. त्यासाठी आगामी २५ वर्षं अत्यंत महत्त्वाची आहेत. संसदेमध्ये राष्ट्रपतींनी काल केलेलं अभिभाषण हे देशातल्या १४० कोटी जनतेच्या विश्वासाचं प्रतिक असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><>

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गंत शहरी भागात आतापर्यंत १ कोटी ६४ लाखांहून अधिक घरांना मंजुरी दिल्याची माहिती केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार राज्यमंत्री तोखन साहू यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना दिली. या योजनेअंतर्गंत आतापर्यंत मंजूर केलेल्या एकूण घरांपैकी ९८ लाखांहून अधिक घरे बांधून पूर्ण झाली असून ती लाभार्थ्यांना देण्यात आल्याचं साहू यांनी यावेळी सांगितलं. केंद्र सरकारनं या योजनेअंतर्गंत केलेल्या २ लाख कोटी रुपयांच्या आर्थिक सहाय्याचा लाभ १ कोटींहून अधिक नागरिकांनी घेतला असून त्यात अल्पसंख्याक समुदायांसाठी २२ लाखांहून अधिक, अनसूचित जाती-जमातींसाठी २४ लाख तर मागासवर्गीयांसाठी ४२ लाख घरं मंजूर केली आहेत. तर महिलांसाठी ९० लाख घरे मंजूर केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

भारत ऊर्जा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल जागतिक ऊर्जा क्षेत्रातल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. प्रधानमंत्र्यांच्या नवी दिल्लीतल्या लोककल्याण मार्गावरल्या निवासस्थानी ही बैठक झाली. भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेना वाटचाल करत असून जागतिक उर्जा पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका निभावत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. या संवादादरम्यान, प्रधानमंत्र्यांनी भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधींकडे लक्ष वेधलं. तसंच गुंतवणुकदारस्नेही धोरणात्मक सुधारणांचा उल्लेख करत अन्वेषण आणि उत्पादनामध्ये शंभर अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची शक्यता अधोरेखित केली. कॉम्प्रेस्ड बायो गैसमध्ये ३० अब्ज अमेरिकन डॉलर्सची संधी असल्याचंही त्यांनी सांगितले.

जागतिक ऊर्जा क्षेत्रात सध्या प्रचंड अस्थिरता आहे, मात्र यात संधीही तितक्याच आहेत, असं सांगत प्रधानमंत्र्यांनी नवोन्मेष, सहकार्य आणि भागीदारीचं आवाहन केलं.

<><><><>

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आसामच्या २ दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. अमित शहा यांच्या हस्ते उद्या दिब्रुगड इथं आसाम विधान भवनाचं दुसरं संकुल, आमदार निवास, वन्यजीव आरोग्य आणि संशोधन संस्था यांची पायाभरणी केली जाणार आहे. यासोबतच, दिब्रुगडमध्ये उभारलेल्या अत्याधुनिक स्टेडिअमच्या पहिल्या टप्प्याचं उदघाटन आणि दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी देखील शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर आसाम मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ते गुवाहाटी इथल्या भाजपा मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांशी चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याची सांगता करणारा बिटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळी दिल्लीत विजय चौकात होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय मंत्री उपस्थित राहाणार आहेत. या समारंभात लष्कर, नौदल, वायुसेना आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे वाद्यवृंद सहभागी होणार आहेत.

बिटिंग रिट्रीट या समारंभात भारताच्या समृद्ध लष्करी वारशाचं दर्शन होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. देशाच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य समर्पित करणाऱ्या जवानांविषयी देशवासियांना अभिमान आहे, असं ते म्हणाले.

सशस्त्र दलाची शिस्त, एकता आणि नितीमत्ता बिटिंग रिट्रिटमधून दिसते असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. हा समारंभ देशाभिमानाचं प्रतीक आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मुलभूत अधिकार असला तरी त्याचा वापर हा एखाद्या व्यक्तीविरोधात शिवराळ भाषा आणि अपमानजनक मोहिम राबवण्यासाठी केला जाऊ शकत नाही, असं दिल्ली उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. बदनामीकारक मोहीम राबवणं, इतरांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारं वक्तव्य करणं याला राज्यघटनेनेच प्रतिबंध घातला आहे, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं. एका कंपनीच्या माजी कर्मचाऱ्यानं कंपनी विरोधात चालवलेल्या ऑनलाईन मोहिम प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं हे मत नोंदवलं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या काल झालेल्या चौथ्या सामन्यात भारताला न्यूझिलंडकडून पराभव पत्करावा लागला. न्यूझिलंडच्या २१६ धावांचा पाठलाग करताना १९ व्या षटकात भारताचे सर्व फलंदाज तंबुत परतल्यामुळे भारताला १६५ धावाच करता आल्या. भारताकडून शिवम दुबेने ६५ आणि रिंकु सिंगने ३९ धावा केल्या. न्यूझिलंडच्या मायकेल सँटनरने तीन गडी बाद केले. त्याआधी न्यूझिलंडने टिम सेफर्टच्या ६२ आणि डेवॉन कॉनवेच्या ४४ धावांच्या जोरावर २१५ धावा केल्या.

**<><><><><>**

दिल्ली, हरियाणा, चंदीगढ, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये थंडीच्या तीव्र लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. यासह बिहार, मध्य प्रदेश, ओदिशा, राजस्थान, पश्चिम बंगाल, सिक्कीम, उत्तर प्रदेशासह उत्तराखंडमध्ये दाट धुकं पसरण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**